# ठाणे महानगरपालिकेचा वार्षिक अर्थसहाय्य अहवाल
# सन २००९ - २०१०

## प्रस्तावना

महाराष्ट्र अधिनियम सन १९९४ चा ४१ च्या कलम ७१ अन्वये नव्याने दाखल करण्यांत आलेल्या कलम ९५ अ ने सेवा पुरविण्यांत अंतर्भूत असलेल्या अर्थसहाय्यांच्या मर्यादा कळवण्याच्या गरजेवर भर दिला आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार गेल्या वर्षात पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन व रस्त्यावरील दिवाबत्ती या सेवा अर्थसहाय्यीत तत्वावर पुरविण्यांत आल्या का आणि तशा त्या पुरवल्या असतील तर अर्थसहाय्याची मर्यादा, अर्थसहाय्याची रक्कम ज्यामधून भागविण्यांत आली ते स्त्रोत आणि अशा अर्थसहाय्याचे लाभाधिकारी असलेले स्थानिक लोकांचे गट किंवा प्रवर्ग या बाबींचा निर्देश केल्याबाबतचा अहवाल महापालिकांनी अर्थसंकल्पीय अंदाजासोबत सादर करावयाचा असतो. ठाणे महानगरपालिका त्या अनुषंगाने अर्थसहाय्य अहवाल सन २००२ पासून सादर करीत आहे.

ठाणे महानगरपालिका अर्थसहाय्यित तत्वावर देत असलेल्या पाणी पुरवठा, मलनिःसारण, घनकचरा व्यवस्थापन व रस्त्यावरील दिवाबत्ती या सेवांतील गुंतवणुकीच्या स्वरुपांतील त्याचा परिणाम परिमाणबद्ध करणेबाबत प्रत्येक वर्षी प्रयत्नशील असते. या अनुषंगाने प्रस्तुत सेवांतर्गत अर्थसहाय्य स्वीकार्य मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी काही योजना विकसित करण्याचा प्रयत्न महापालिका दरवर्षी करीत आहे.

## अ) पाणी पुरवठा :

ठाणे महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन ठाणे शहराची वाढती मागणी भागविण्यासाठी पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. या करीता पाणी वितरण व्यवस्थेसाठी सुधारणा करणे व शहरातील नागरिकांना समप्रमाणात पाण्याचे वाटप करणेसाठी महापालिका कटीबद्ध आहे. पाणी पुरवठा विभागाकडील उत्पन्न व खर्च यामध्ये २४.५६% एवढी तफावत दिसून येते.

### उत्पन्न :

पाण्यामुळे जो काही एकूण महसूल मिळतो त्यातील ९०% महसुल पाण्याच्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नाचा आहे. पाण्याच्या विक्रीच्या उत्पन्नामुळे प्राप्त होणारा महसूल, पाणी लाभ

कर, पाणी आकार आणि टँकरने पुरवलेल्या पाण्याच्या विक्रीतून मिळालेला महसूल पुढीलप्रमाणे आहे.

**घरगुती वापराच्या पाणीपट्टीचे दर :**

| वर्ष | झोपडपट्टी / बैठया चाळी प्रती महिना /प्रतीधारक | इमारती व संकुलनासाठी प्रती कुटुंब /प्रती सदनिका |
|---|---|---|
| २००५-२००६ | रु.७०/- | रु. १४०/- |
| २००६-२००७ | रु.८०/- | रु. १६०/- |
| २००७-२००८ | रु.८०/- | रु.१६०/- |
| २००८-२००९ | रु.८०/- | रु.१६०/- |
| २००९-२०१० | रु.८०/- | रु.१६०/- |

(रु.कोटीमध्ये )

| तपशील | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|
| १. जललाभ कर | ९.६५ | १०.६२ | १५.२४ | १७.१३ | १८.१६ |
| २.सर्व घरगुती /व्यापारी जोडण्यासाठी सरसकट दर आकारुन मिळालेले उत्पन्न | ३४.२९ | ४०.९९ | ५२.८४ | ५७.८० | ५७.४१ |
| ३. टँकरने पाणी विक्रीचे उत्पन्न | ०.०५ | ०.०५ | ०.०५ | ०.०७ | ०.०५ |
| एकूण | ४३.९९ | ५१.६६ | ६८.१३ | ७५.०० | ७५.६२ |

**खर्च :**

**१) पाणी खरेदी खर्च :** पाणी खरेदीवरील खर्चापैकी अंदाजे सर्व खर्च मुंबई महानगरपालिका, एम.आय.डी.सी. आणि स्टेम व इरीगेशन विभागाकडून करावयाचे पाणी खरेदीवरील आहे. सद्य:स्थितीत खालील संस्थांकडून पाणी खरेदी केली जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई महानगरपालिका | ३० द.ल.लि. | दर रु.४.०० | प्रती १००० लिटर |

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई महानगरपालिका | ३० द.ल.लि. | दर रु.८.०० | प्रती १००० लिटर |
| एम.आय.डी.सी. | ८० द.ल.लि. | दर रु.८.०० | प्रती १००० लिटर |
| स्टेम प्राधिकरण | १२२ द.ल.लि. | दर रु.४.३०<br>दर रु.३.५० | २९ द.ल.लि.साठी प्रती १००० लिटर,<br>९३ द.ल.लि.साठी प्रती १००० लिटर<br>(दि. १/४/२००९ पासून ) |

उपरोक्त नमूद केलेल्या दरानुसार मागील ५ वर्षात पाणी खरेदीकरीता करण्यांत आलेला खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम ( रु.कोटीमध्ये ) |
|---|---|---|
| १ | २००५-०६ | ६४.५४ |
| २ | २००६-०७ | ६२.५४ |
| ३ | २००७-०८ | ६२.०० |
| ४ | २००८-०९ | ६१.६४ |
| ५ | २००९-१० | ५९.८७ |

## २. देखभाल दुरुस्तीवरील खर्च :

| अ.क्र. | वर्ष | रक्कम ( रु.कोटीमध्ये ) |
|---|---|---|
| १ | २००५-०६ | २७.५८ |
| २ | २००६-०७ | २९.४३ |
| ३ | २००७-०८ | ३२.८४ |
| ४ | २००८-०९ | १५.६० |
| ५ | २००९-१० | ३६.४६ |

## ३. दायित्व :

### पाणी पुरवठा योजनांसाठी उभारलेले कर्ज :

सद्य:स्थितीत ३१/०३/२०१० अखेर ठाणे महानगरपालिकेवर रुपये १०८.०६ कोटीचे कर्ज असून त्यापैकी पाणी पुरवठा योजनेकरीताचे कर्ज रु.६०.३२ कोटी एवढे आहे.

<u>इतर दायित्व (वादग्रस्त देणी )</u> : ठाणे महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून पाणी खरेदी करते. या संस्थांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व एम.आय.डी.सी. यांचेकडून खरेदी करण्यांत आलेल्या पाण्यांच्या बिलांबाबत वाद निर्माण झाला होता. सद्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ठाणे महानगरपालिकेकडे रु. ११९.३६ कोटी रकमेची थकबाकी दर्शविली आहे. यापैकी रु.२१.९२ कोटी मूळ थकीत रक्कम व रु.९७.४४ कोटी एवढी विलंब शुल्काची रक्कम दर्शविण्यांत आली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हिशेबाप्रमाणे महापालिकेस मान्य असलेल्या सर्व रकमा भरलेल्या आहेत. सदरचा वाद हा प्रामुख्याने पाण्याच्या दराबाबतचा आहे. एम.आय.डी.सी.च्या बाबतीत महापालिकेकडे एकूण रु. ३१६.९५ कोटीची थकबाकी असल्याचे दर्शविले आहे. एम.आय.डी.सी. चा वाद आहे मात्र अद्यापही एम.आय.डी.सी.च्या बिलात पाण्याच्या थकबाकीच्या रकमा दर्शविण्यांत येतात. सारांशाने ठाणे महानगरपालिकेकडे रु.३३२.६७ कोटी वादग्रस्त देणी दिसत आहेत.

४) सबसिडीः-

एकूण पाणी खरेदी व उत्पन्नाचा विचार करता , सन २००९-१० या सालासाठी रु. १०३.५४ कोटी खर्च तर रु. ७८.११ कोटी जमा झालेली आहे. याचा विचार करता २४.५६ टक्के सबसिडी देण्यात आली आहे.

## ५) नियोजित प्रकल्प व योजना :

१. **मिटरींग पद्धती** : - ठाणे महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत रिफार्म अजेंडानुसार १००% मिटरींग करावयाचे आहे. याबाबतचा दोन टप्यात निविदा मागवुन काम करण्यात येणार आहे. प्रथम टप्यामध्ये सर्व प्रकारची बिगर घरगुती संयोजने तसेच १" व्यासावरील सर्व व्यासांची घरगुती संयोजनांचा समावेश करण्यात आला असून, अशा प्रकारचे मिटरींग केल्याने एकूण ३५% परीमाणा एवढा पाणी पुरवठा मोजता येईल उर्वरीत कनेक्शनवर द्वितीय टप्यात मिटरींग करण्यात येणार आहे.

२. **पावसाच्या पाण्याचे संवर्धनः-**

ठाणे महानगरपालिकेमार्फत सर्व नविन इमारतींना पावसाच्या पाण्याचे संवर्धन करणे बंधनकारक करण्यात आले आहे या बाबत ठाणे महानगरपालिकेने यापुर्वी कोपरी प्रभाग समिती कार्यालय या इमारतीचे व महापालिकेच्या मालकीच्या बॅडमींटन कोर्ट येथे वर्षा

संवर्धन करणेचे काम करण्यात आले आहे. तसेच वर्तकनगर / उथळसर व नोपाडा प्रभाग समिती कार्यालय इमारतीस वर्षा संवर्धनाचे काम हाती घेण्यांत आले आहे.

## ब ) मलनि:सारण :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे सन १९६६ साली जुनी योजना कार्यान्वीत केली तेव्हापासून ठाणे शहरामध्ये मलनि:सारण योजना अस्तित्वात आहे. सदर योजनेमध्ये १९८२ साली टप्पा क्र. १ अंतर्गत सुधारणा करण्यात आली व २००१ साली हे काम पूर्ण करण्यांत आले. सदर टप्पा १ अंतर्गत मलनि:सारण योजना ४,८५,४८९ एवढया लोकसंख्येसाठी म्हणजेच आजच्या लोकसंख्येच्या ३८ टक्के लोकसंख्येसाठी कार्यान्वीत करण्यांत आली. अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण प्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | क्षेत्रफळ | १७ चौ.कि.मी. |
| २) | मलवाहिन्या | ६९.२ कि.मी. |
| ३) | मॅनहोल्स | २१७४ |
| ४) | उद्‌चंन केंद्र | ८ |
| ५) | मलशुद्धीकरण केंद्र | ५४ द.लि.लि |
| ६) | विल्हेवाट | खाडी |

**उत्पन्न :** सद्यस्थितीत महापालिकेस मलनि:सारण अंतर्गत मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

(रु.कोटीमध्ये )

| तपशील | २००५-०६ | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. मलनि:सारण लाभकर | ६.६२ | ६.८९ | १०.२३ | १२.१४ | ११.५३ |
| २. मलनि:सारण कर | ५.७७ | ७.५१ | ९.०८ | ९.५४ | १२.८७ |
| ३. आकार | ०.११ | ०.०३ | ०.१३ | ०.०३ | ०.०२ |
| एकूण | १२.५० | १४.४३ | १९.४४ | २१.७१ | २४.४२ |

## खर्च :

१. **देखभाल दुरुस्तीवरील खर्च** : मलवाहिन्या देखभाल दुरुस्तीवरील मागील ५ वर्षातील खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम (रु.कोटीमध्ये ) |
|---|---|---|
| १ | २००५-०६ | १.९७ |
| २ | २००६-०७ | २.७५ |
| ३ | २००७-०८ | ३.२६ |
| ४ | २००८-०९ | ४.९३ |
| ५ | २००९-१० | ३.९९ |

२. **दायित्व** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठयासाठी उभारलेल्या कर्जामध्येच मलनि:सारण योजनेच्या कर्जाचा समावेश आहे.

अस्तित्वातील मलनि:सारण योजना ही महापालिकेच्या केवळ १७ चौ.कि.मी. मधील लोकसंख्येस पुरेशी असून संपूर्ण महापालिका हद्दीतील लोकसंख्येला भुयारी गटार योजनेच्या नेटवर्कमध्ये समाविष्ट करुन घेणेच्या दृष्टिने केंद्र शासनाच्या जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत अनुदानातून राबविण्यांत येणार असून खालीलप्रमाणे प्रकल्प प्रस्तावित केलेले आहेत.

१. भुयारी गटार योजना फेज - १ :

ठाणे शहरामध्ये टप्पा क्र.१ अंतर्गत साधारणत: १४३ कि.मी. लांबीची मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्र. १ अंतर्गत उद्ंचन केंद्र क्र. १,२,३,५,६,७ व ८ येत आहेत. या योजनेसाठी एकूण रु.२२९.२६ कोटी खर्च येणार आहे.

२. भुयारी गटार योजना फेज - २ :

घोडबंदर रोड (मानपाडा पर्यंत) व कळवा विभागाअंतर्गत साधारणत: १२२.१९ कि.मी लांबीची मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्र. २ अंतर्गत उदचंन केंद्र क्र. ४,९,१० के.एस

१, के.एस २, के.एस ३, के.एस ४ येत आहेत. या योजनेसाठी एकूण रु. २०४.०५ कोटी खर्च येणार आहे.

३. भुयारी गटार योजना फेज - ३ : मुंब्रा विभागात टप्पा क्र. ३ अंतर्गत साधारण: २५.० कि.मी लांबीचे मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्र. ३ उदंचन केंद्र क्र. एम.पी.एस. १,२,३ येत आहेत. या योजनेसाठी एकूण रु. ७०.७३ कोटी खर्च येणार आहे.

टप्पा क्र. १ अतंर्गत (शहर व वागळे इस्टेट परीसर)साधारण: १२०की.मी. लांबीची मलवाहीनी टाकण्याचे प्रस्तावित असून त्यापैकी ५० कि.मी. लांबीची चे काम पुर्ण झालेले आहे. व उर्वरीत काम प्रगती पथावर आहे. प्रस्तुत टप्प्याअंर्तगत ७ उदंचन केंद्राचे काम प्रस्तावित असून त्यापैकी ४ उदूंचन केंद्रांचे काम अतिम टप्प्यात असून ३ उदूंचन केंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रस्तुत टप्प्याअंतर्गत कोपरी येथे १२० दश लक्ष लिटर्स क्षमतेचे मल प्रक्रिया केंद्राचे काम ८०% पुर्ण झालेले आहे.

टप्पा क्र. २ ( कळवा, घोडबंदर रोड परीसर) अंर्तगत १२२ किमी. लांबीचे मलवाहीनी टाकण्याचे काम प्रस्तावित असून त्यापैकी सुमारे ६ कि.मी. लांबीची मलवाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झालेले आहे. या टप्प्या अंर्तगत ७ मलउदंचन केद्र बांधण्याचे व १००द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रीया केंद्र बांधण्याचे काम प्रस्तावीत आहे. त्यापैकी ५ उदूंचन केंद्रोच काम सुरु करण्यात आलेले आहे. मलवाहीनी टाकण्याचे काम प्रगती पथावर असून उदंचन केद्राचे काम सुरू करण्यात आलेले आहे.

टप्पा क्र.३(मुंब्रा )अंतर्गत २५ कि.मी. लांबीचे मलवाहीनी टाकण्याचे काम प्रस्तावीत असून त्यापैकी सुमारे ७ कि.मी. लांबीची मलवाहिनी टाकण्याचे काम पुर्ण झालेले आहे. या टप्प्याअंतर्गत ३ मलउदंचन केंद्र बांधण्याचे व ३२द.ल.ली. क्षमतेचे मलप्रक्रीया केंद्र बांधण्याचे काम प्रस्तावीत आहे. मलवाहीनी टाकण्याचे कात प्रगती पथावार असून उदंचन केंद्र व मलप्रक्रिया केद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**प्रस्तावित दर** : उपरोक्त नवीन प्रकल्प राबवित असतांना लाभार्थीकडून मलनि:सारण जोडणी शुल्क, मलनि:सारण कर व अनधिकृत मलवाहिनी जोडणी करणा-यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत मा.महासभेने ठराव क्रमांक १८२/१५ दि.१७.२.२००५ पारीत केला आहे. या ठरावान्वये मलनि:सारण आकार हा मासिक पाणी बिलाच्या ५०% याप्रमाणात आकारण्यांत

येणार आहे. प्रस्तुत आकार मलनि:सारण जोडण्या पूर्ण झाल्यानंतर आकारण्यांत येणार आहे. प्रस्तावित आकारणीमुळे अ अंदाजपत्रकातील वर्ग करावयाची रक्कम कमी प्रमाणात करावी लागेल.

**देखभालीवरील खर्च** : नियोजित प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीकरीता वार्षिक १५ % ते २०% खर्च अपेक्षित आहे.

## क) घनकचरा व्यवस्थापन :

**प्रस्तावना:**

शहरात दररोज ६०० ते ६२५ टन घनकचरा निर्माण होतो.शहरातील रस्ते -गल्यांची साफसफाई करणे,प्रसाधन गृहाची साफसफाई करणे,घनकच-याचे संकलन करणे,वाहतूक करणेकरीता महापालिकेच्या आस्थापनावर एकूण २३०० कर्मचारी आहेत. तसेच शहरातील महत्वाच्या रस्यांची साफसफाई करणेकरीता खाजगीकरणामार्फत ७१२ कामगार कार्यरत आहेत.

| वर्ष | रक्कम (रु.कोटीमध्ये ) |
|---|---|
| २००५-०६ | ४४.७२ |
| २००६-०७ | ४६.७० |
| २००७-०८ | ५३.३९ |
| २००८-०९ | ५९.६१ |
| २००९-१० | ७७.१६ |

**उत्पन्न:** घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कामकाज शहरातील नागरीकांना सफाईची मुलभूत सुविधा पुरविण्याचा विभाग असून आरोग्य सुविधांशी निगडीत आहे. त्यामुळे हा विभाग उत्पन्नाशी निगडीत नाही. उत्पन्न प्रामुख्याने विशेष सफाई कर,विशेष स्वच्छता विषयक उपकर आणि कचरा करण्याबद्दल दंड यापासून मिळते. बिगर निवासी सेवा कर (युजर चार्जेस) आकरण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. तथापी,सदर प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही.

**खर्च:** घनकच-यावर होणार खर्च हा मुख्यत: वेतन, इंधन, भाडयाची वाहने, नाले सफाई, खाजगी क्षेत्राचा सहभागाबद्दल करावयाची प्रदाने इत्यादिंवर होतो. शहरातील ११२ कि.मी.लांबीचे रस्त्याचे जाळे सफाईचे काम खाजगीकरणातून करण्यात येते. ८२ कि.मी.लाबींच्या नाल्यांची साफ सफाई करण्यात येत असते.

भाडवली खर्च हा प्रामुख्याने वाहन व यंत्रसामुग्री खरेदी,क्षेपणभूमी विकसीत करणे यावर होत असतो.

**नियोजित प्रकल्प उपाय योजना:** घनकचरा व्यवस्थापन विभागचे कामकाज हे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० नुसार करणे बंधनकारक आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागात सुधारणा करण्याच्या कामांसाठी रक्कम रु.७१.९५ कोटीचा प्रकल्प अहवाल जे.एन.यु.आर.एम.अंतर्गत शासनास सादर करण्यात आलेला आहे.

**खाजगीकरणातून कामांची अमंलबजावणी :**

१.दैनदिन कचरा गोळ करण्यासाठी घंटागाडी योजना राबविण्यात येत आहे. दाटीवाटीच्या वस्तीत व झापडयांमध्ये घंटागाडया जावू शकत नाहीत अशा ठिकाणी कचरा वेचक. या ठिकाणी त्यामुळे घरोघरी कचरा संकलनाचे ९० टक्के उदिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहे. सदरचे काम खाजगीकरणातून करण्यात येत असल्याने इंधन खर्च,वाहनांवरील खर्च,व देखभालीवरील खर्चात बचत होते.

२. नविन वाहने खरेदीवर होणारा खर्च वाचणार आहे.

३.कंत्राटी पध्दतीने रस्ते व सार्वजिनक शौचालये सफाई केल्याने स्थायी आस्थापनेवर होणा-या खर्चापेक्षा कमी खर्चात कामे होतात.

**भावी दृष्य:**

घनकचरा संकलन,वाहतूक व विल्हेवाट यासाठी येणारा खर्च विचारात घेता घनकच-यापासून खालील बाबींवर उत्पन्न अपेक्षित आहे.

१) बायोमिथेनेशन प्रकल्प

२) गांडुळखत प्रकल्प

३) प्लास्टीक पुर्नवापर प्रकल्प

४) घनकचरा प्रक्रीया प्रकल्प

शिफारशी व कृती योजना

१ ) घनकचरा विभागाकडील सर्व वाहनांना व्हेईकल ट्रॅकींग सिस्टीम बसविणे अनिवार्य केलेले आहे.

२ ) घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नागरी घनकचरा ( व्यवस्थापन व हाताळणी ) नियम, २००० नुसार करावयाच्या कार्यवाहीसाठी लोकसहभाग,सेवांचे खाजगीकरण करण्यात येत असून नियमाप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

## ड) रस्त्यावरील दिवाबत्ती :

**प्रस्तावना** : महापालिका ही सेवा १०० % अनुदानित अर्थसहाय्य देवून पुरविते. नागरिकांच्या सोयीसाठी ठाणे शहरातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांवर २९,८३९ पथदिप व ६७ हायमास्ट दिवे बसविण्यांत आले आहेत. यामध्ये महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्ते व झोपडपट्टयांमधील रस्त्यांचा समावेश आहे. विद्युत पुरवठयाचा मुख्य स्त्रोत MSEDCL हा आहे. त्यांना विजेच्या आकारापोटी मागील वर्षात अदा केलेली रक्कम खालीलप्रमाणे.

| वर्ष | रक्कम ( रु. कोटीमध्ये ) |
|---|---|
| २००५-०६ | ४.७० |
| २००६-०७ | ५.१४ |
| २००७-०८ | ७.३१ |
| २००८-०९ | ७.६४ |
| २००९-१० | ८.७९ |

तसेच रस्त्यावरील दिव्यांची देखभाल व दुरुस्तीकरीता मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

| वर्ष | रक्कम ( रु. कोटीमध्ये ) |
|---|---|
| २००५-०६ | २.४९ |
| २००६-०७ | २.४६ |

| | |
|---|---|
| २००७-०८ | ३.४७ |
| २००८-०९ | ३.८५ |
| २००९-१० | ३.९१ |

ठाणे महानगरपालिका जरी रस्त्यावरील दिवाबत्ती ही सेवा १००% अर्थसहाय्य देवून पुरवित असली तरी, ऊर्जा बचत व ऊर्जा संवर्धनात महापालिकेने केलेल्या उल्लेखनिय कार्यवाहीमुळे विजबचत झाली आहे व त्यामुळेच एकूणच खर्चात बचत होत आहे. ठाणे महानगरपालिकेने सन २०००-०१ यावर्षापासून ऊर्जा बचत व ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रामध्ये विशेष मोहिम हाती घेतली.

१) महापालिकेने विज बचतीसाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. यामध्ये पथदिपाच्या पॅनेलमध्ये मायक्रोप्रोसेसरवर आधारित अत्याधुनिक टायर्मस बसविणे, उच्च दाबाचे विज कनेक्शनमध्ये पॉवर फॅक्टर वाढवून विज बिलात बचत करणे, इमारतीमधील विद्युतीकरणात टी - ८ टयूब लाईट , इलेक्ट्रॉनिक चोकसह बदली करणे आणि विविध इमारतींमधील वातानुकुलित यंत्रणेमध्ये तांत्रिक सुधारणा करण्यांत आल्या आहेत. या मोहिमेंतर्गत मार्च २०१० अखेर पर्यंतच्या सात आर्थिक वर्षामध्ये सन २०००-२००१ या मूळ वर्षाच्या तुलनेत महापालिकेच्या विज बिलामध्ये रु. १९.९१ कोटी इतक्या रकमेची लक्षणीय बचत झालेली आहे. या दरम्यान विद्युत भारातही लक्षणीय वाढ झाली असता, विज बचत करण्यांत आली आहे.

२) सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टिने महापालिकेच्या मंजूर विकास नियमावलीमध्ये सुधारणा करण्यांत आली असून त्यानुसार अस्तित्वातील निवासी वगळता सर्व इमारतींवर सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याचे प्रकल्प उभारणे बंधनकारक केले आहे.

अस्तित्वातील निवासी वापराच्या इमारतीवर सौर उष्ण जल संयंत्र बसविल्यास अशी यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वीत असेपर्यंत संबंधितांना वार्षिक मालमत्ता करामध्ये १०% सूट दिल्यामुळे आतापर्यंत रु. ७.१५ लक्ष लिटर प्रती दिन सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा कार्यान्वीत करण्यांत आली आहे.

३) ठाणे महानगरपालिकेने स्वत:च्या इमारतीवर ३८,५०० लिटर प्रतीदिन सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा कार्यान्वीत केली असून त्यामुळे वार्षिक रु. १६.५८ लक्ष रुपयांची बचत होत आहे.

४)	ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत १५ टन ओला कचरा वापरुन मिथेन गॅस तयार करणा-या बायोमिथेनेशन प्लॉटची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रकल्प कार्यान्वीत करण्यांत आला आहे. सदर मिथेन गॅस पासून ५०KVA क्षमतेच्या जनित्र संचामार्फत विजनिर्मिती करणेत येत असून सदर विजेचा वापर रुग्णालयात करण्यांत येत आहे. त्याचबरोबर ठाणे शहरामध्ये विविध ठिकाणी विकेंद्रीत पद्धतीने २ टन क्षमतेचे बायोमिथेनेशन प्लॉटची उभारणी करण्याचे काम हाती घेण्यांत आले आहे.

५)	छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे सौर ऊर्जेवर आधारित १६० टन क्षमतेच्या वातानुकुलन प्रकल्पाचे टप्पा क्र. १च्या उभारणीचे काम पुर्ण झाले असून त्याचे megarment & verification करण्यांचे काम प्रगती पथावर आहे. सदर प्रकल्प पुर्ण रीत्या २०११- १२ च्या तिमाही कालावधीत होऊन कार्यान्वित होण्याचे अपेक्षित आहे.

६)	ठाणे शहरातील पथदिपांच्या कंट्रोल पॅनेलमध्ये अत्याधुनिक विज बचतिच्या उपकरणांचा वापर करुन विज वापरात बचत करणे आणि GSM तंत्रज्ञानाचा वापर करुन पथदिपांचे कंन्ट्रोल करण्यांचे प्रस्तावित आहे.

७)	केंद्र शासनाने ११ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ठाणे शहराची सौर शहर विकसीत करण्यासाठी निवड केली आहे. सन २०१०- ११ मध्ये ठाणे शहरात सौर उर्जाकेंद्र कार्यान्वित करण्यांत येणार आहे.